# नागराजला 'रवळनाथ'कडून आर्थिक मदत

## पिंगुळी-राऊळवाडी येथील शालेय विद्यार्थी ह्दयविकाराने त्रस्त

**प्रतिनिधी**
कुडाळ



पिंगुळी : नागराजकडे आर्थिक मदत देताना रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले. (डावीकडून) रवळनाथचे कुडाळ शाखा सल्लागार मनोहर गुरबे, प्रा. डॉ. कॅ. एस. टी. आवटे, रुपाली शिरसाट, सीए सागर तेली, प्रभारी शाखाधिकारी समीर मोरजकर व अन्य.

पिंगुळी-राऊळवाडी येथील नागराज इराप्पा परीट या गरीब बालकाच्या वैद्यकीय उपचारासाठी श्री रवळनाथ को. ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे १५ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली, अशी माहिती श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीच्या प्रसिद्धी पत्रकात देण्यात आली आहे.

पिंगुळी शाळा क्रमांक १ मध्ये शिकणाऱ्या नागराजच्या डाव्या हाताच्या पाचही बोटांना गँगरीन झाले आहे. त्याला लहानपणापासूनच दम्याचा त्रास असून शालेय आरोग्य तपासणीत त्याला ह्दयविकाराचा त्रास असल्याचे निदान झाले आहे. नागराजच्या या आजारामुळे त्याच्या कुटुंबियांना आर्थिक मदतीची गरज होती.




नागराजचे कुटुंब बेळगाव जिल्ह्यातील असून त्याचे वडील गवंडीकाम करतात. आर्थिक परिस्थितीमुळे नागराजवरील वैद्यकीय उपचारासाठी त्यांना दानशूर व्यक्ती व संस्थांच्या मदतीची गरज असल्याचे वृत्त सोमवारी 'तरुण भारत'ने प्रसिद्ध केले होते. रवळनाथ परिवाराने त्याच्या मदतीसाठी हात पुढे केला आहे. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले व रवळनाथच्या कुडाळ शाखा पदाधिकाऱ्यांनी नागराजच्या कुटुंबियांची भेट घेऊन ही मदत सुपुर्द केली. रवळनाथचे कुडाळ सल्लागार प्रा. मनोहर गुरबे, प्रा. डॉ. कॅ. आवटे, सी. ए. सागर तेली, रुपाली शिरसाट, प्रभारी शाखाधिकारी समीर मोरजकर उपस्थित होते.


तरुण भारत Tue, 17 March 2020
epaper.tarunbharat.com/c/50032639